परिपत्रक

क्र. एबाविसेयो/का-२/ १०६३ /२००८
आयुक्तालय,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
रायगड भवन, रिअर विंग, पहिला मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक :- १७ मार्च, २००८

**विषय :- आपली अंगणवाडी अभियान**

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्रामध्ये ७६००० अंगणवाडया असून या माध्यमातून बालकांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. अंगणवाडी मार्फत देशाचे भावी नागरिक घडविण्यासाठी कार्य करण्यात येत आहे. असे प्रयत्न करतेवेळी समाजाचा व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग महत्वपूर्ण व मोलाचा आहे. असे काम सर्वानी मिळून केल्यास बालकांचा सर्वांगिण विकास घडवून आणून उद्याचे भक्कम नागरिक घडविण्याचे काम प्रभावी व सोपे होईल. यात तिळमात्र शका नाही.

भविष्यातील बालक सदृढ, बुध्दीमान व सशक्त राहील यासाठी किशोरवयीन मुली, गरोदर महिला यांना भक्कम करणे आवश्यक आहे. यासाठी मुलींकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. किशोरवयीन मुली (भावी माता ) व गरोदर महिलांना आरोग्य व पोषण विषयक ज्ञान देणे गरजेचे आहे. यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग असणे आवश्यक आहे. याकरिता **“ आपली अंगणवाडी ”** हे अभियान राबविण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे.

**“ आपली अंगणवाडी ” हे अभियान जनमानसात रुजवून जनतेला सामील करुन १४/४/२००८ ते १५/८/२००८ या कालावधीत खालील ६ उद्दिष्टये पुर्ण करावयाची आहेत.**

१. अंगणवाडी केंद्रातुन दिल्या जाणा-या सर्व सेवांची माहिती आतापर्यत जितक्या लोकांना आहे त्यापेक्षा दुप्पट लोकांना माहिती होणे.

२. घरांत मुलींना सर्वाच्याआधी जेवायला घालणेबाबत पालकांना उद्युक्त करणे.

३. गर्भधारणा झाल्यानंतर गरोदर स्त्रियांची अंगणवाडी केंद्रात त्वरित नांव नोदणी करणे.

४. स्तनपानाची खालील ४ सुत्रांची माहिती जनमानसात करुन देणे.

***अ- बाळ जन्मल्याबरोबर 1 तासाच्या आत स्तनपान करावे***

***ब- सहा महिन्यापर्यंत फक्त स्तनपानच करावे.***

***क- सहा महिन्यानंतर पुरक आहार सुरु करावा.***

***ड- दोन वर्षापर्यंत स्तनपान सुरु ठेवावे.***

५) महिलांना अतिकष्टाची कामे देऊ नये, याबाबत जनमत तयार करणे.

६) १८ वर्ष पुर्ण झालेनंतरच मुलींचे लग्न करणेबाबत विचार करावा, असे समाजात प्रबोधन करणे.

वरील उदिष्टांच्या पुर्ततेसाठी, जनजागरणकरावे लागेल व त्यासाठी वेगवेगळया प्रसार माध्यमांच्या उपयोग करुन घ्यावा लागेल. ती प्रसार माध्यमे खालील प्रकारची असू शकतील.

**प्रसार माध्यमे**

**अ)** प्रभातफेरी काढणे, दिंडी काढणे, कीर्तन, शाळामार्फत अभियान राबविणे, चर्चासत्र घडवुन आणणे.

**ब)** विविध क्षेत्रातील अधिकारी, राजकीय पुढारी, वक्ते, समाजप्रबोधनकार, धार्मीक नेते इ. यांना या अभियानाअंतर्गत कमीत कमी एक दिवस अंगणवाडीत निमंत्रित करावे.

**क)** शासनातील शासकीय / निमशासकीय अधिकारी पोलीस अधिकारी, इंजिनीयर्स, क्षेत्रीय अधिकारी, पोस्ट मास्टर, बॅक अधिकारी इ. यांनी आपल्या परिक्षेत्रातील कोणत्याही एकातरी अंगणवाडीस भेट द्यावी.

**ड)** भित्ती पत्रके, होर्डीग्स इ. चा वापर करणे.

**इ)** आकाशवाणी, दुरदर्शन वरुन स्फुट जाहिराती प्रसिध्द करणे.

**फ)** स्थानिक केबल धारकांकडून अभियानाची माहिती प्रसारित करणे. सिनेमागृहात मध्यांतरात अभियानाची स्लाईड शो व्दारे प्रसिध्दी करणे.

**ग)** अभियानाचे उपक्रम बाबत माहिती प्रेसनोट द्वारे वेळोवेळी स्थानिक वर्तमान पत्रात देणे (न्युज आयटेम).

याशिवाय रेल्वे स्टेशन, बसस्टँड, आठवडी बाजार, सामुहिक विवाह सोहळे अशा व इतर सार्वजनिक ठिकाणी किंवा मोक्याच्या ठिकाणी प्रसिध्दी केल्यास **“ आपली अंगणवाडी ”** हे अभियान यशस्वी होईल.

४) **आर्थिक तरतूदीबाबत.**

आपली अंगणवाडी अभियान राबविण्यासाठी आयुक्तालयस्तरावरुन प्रति प्रकल्प रु.५०००/- एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याशिवाय या योजनेला चळवळीचे स्वरुप येण्यासाठी सेवाभावी संस्था, आश्रयदाते, खाजगी कंपन्या , लायन्स, रोटरी क्लब यासारख्या संस्थाचेही सहकार्य घेण्यात यावे.

**५) आपली अंगणवाडी अभियानाकरीता खालीलप्रमाणे वेगवेगळया स्तरावर समिती तयार करण्यात यावी.**

**१) जिल्हास्तर ( ग्रामीण ) :-** आपली अंगणवाडी अभियानाचा आढावा घेण्यासाठी तसेच हे अभियान यशस्वी रित्या राबविण्यासाठी जिल्हा पातळीवर एका समितीचे गठन करण्यात यावे. त्याची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) सभापती, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद | - | अध्यक्ष |
| २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) | - | सदस्य सचिव |
| ३) बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण ) | - | सदस्य |
| ४) कार्यकुशल मुख्यसेविका | - | सदस्य |
| ५) जिल्हा आरोग्य अधिकारी | - | सदस्य |
| ६) शिक्षण अधिकारी, प्राथमिक शिक्षण | - | सदस्य |
| ७) महिला व बाल विकास क्षेत्रातील उपक्रमशील NGO | - | सदस्य |
| ८) कार्यकुशल अंगणवाडी सेविका | - | सदस्य |

**२) प्रकल्पस्तर (ग्रामीण) :-** आपली अंगणवाडी अभियानाचा आढावा घेण्यासाठी तसेच हे अभियान यशस्वी रित्या राबविण्यासाठी प्रकल्प स्तरावर एका समितीचे गठन करण्यात यावे. त्याची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) पचायत समिती सदस्य, महिला व बाल कल्याण | - | अध्यक्ष |
| २) बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) | - | सदस्य सचिव |
| ३) मुख्यसेविका | - | सदस्य |
| ४) वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य |
| ५) उपशिक्षण अधिकारी, प्राथमिक शिक्षण | - | सदस्य |
| ६) महिला व बाल विकास क्षेत्रातील उपक्रमशील NGO | - | सदस्य |
| ७) कार्यकुशल मुख्य सेविका | - | सदस्य |
| ८) कार्यकुशल अंगणवाडी सेविका | - | सदस्य |

**३) ग्रामस्तर:-** आपली अंगणवाडीचे अभियान यशस्वी रित्या राबविण्यासाठी ग्राम स्तरावर एका समितीचे गठन करण्यात यावे. त्याची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) सरपंच | - | अध्यक्ष |
| २) अंगणवाडी सेविका | - | सदस्य सचिव |
| ३) ग्रामसेवक | - | सदस्य |
| ४) महिला ग्रामपंचायत सदस्य | - | सदस्य |
| ५) वैद्यकीय अधिकारी / ए.एन.एम | - | सदस्य |
| ६) बीट प्रमुख तथा मुख्य सेविका | - | सदस्य |
| ७) अंगणवाडी माता समिती सदस्य | - | सदस्य |

**४) प्रकल्पस्तर (नागरी ) :-** आपली अंगणवाडी अभियानाचा आढावा घेण्यासाठी तसेच हे अभियान यशस्वी रित्या राबविण्यासाठी प्रकल्प स्तरावर एका समितीचे गठन करण्यात यावे. त्याची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) सभापती , महिला व बाल कल्याण (मनपा /नपा प्रकल्प संबधित) | - | अध्यक्ष |
| २) बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी ) | - | सदस्य सचिव |
| ३) वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य |
| ४) उपशिक्षण अधिकारी, प्राथमिक शिक्षण | - | सदस्य |
| ५) कार्यकुशल मुख्य सेविका | - | सदस्य |
| ६) महिला व बाल विकास क्षेत्रातील उपक्रमशील NGO | - | सदस्य |
| ७) कार्यकुशल अंगणवाडी सेविका | - | सदस्य |

ज्या शहरात नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या नोडल अधिकाऱ्यांनी त्यांचे संपूर्ण कार्यक्षेत्रातील अभियानासाठी संपर्क व समन्वयाचे काम करावे. ज्या प्रकल्पात एका पेक्षा जास्त नगरपालिका आहेत त्या प्रकल्पातील प्रत्येक नगर पालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात यावी.

आपली अंगणवाडी अभियानाच्या जनजागृतीमुळे ICDS च्या सर्व सेवांचा लाभ घेणे हा समाजातील संबधित घटकांचा अधिकार आहे, ही बाब जनमानसात रुजेल व त्यांचे परिणाम म्हणजे लसीकरण १०० % होईल, योग्यपणे स्तनपान करणाऱ्याचे प्रमाण वाढेल, बाळाच्या ६ महिन्यानंतर त्याला योग्य व पुरक वरचा आहार मिळेल, घराघरात मुलींना पुर्ण व प्राथम्याने जेवण मिळेल. या सर्वाचे परिणाम म्हणून उपजत मृत्यू व अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी होईल आणि बालकांचे कुपोषण कमी करता येईल.

मानवी विकासाकांमध्ये हा मुद्या अत्यंत महत्वाचा आहे. तेव्हा सर्व समिती सदस्यांशी समन्वय करुन व स्थानिक संस्था, मान्यवर व्यक्ती, कंपन्या इत्यादींच्या मदतीने अभियान यशस्वी करावे.

आयुक्त,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य

प्रति,
१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद --------------- यांना उचित कार्यवाहीस्तव
२) बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी )----------------- यांना उचित कार्यवाहीस्तव
प्रत, माहितीस्तव सादर,
१) मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) जिल्हाधिकारी, जिल्हा----------------